# भगतसिंग यांचे स्वप्न त्यांच्याच शब्दात

हिंदुस्थान सोशलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन च्या सर्व मित्रांसमोर बोलताना ते म्हणाले,

"फक्त स्वातंत्र्य हेच आपलं अंतिम ध्येय नाही. स्वातंत्र्य म्हणजे नक्की काय? इंग्रजांच्या हातातून सत्ता निघून काही मोजक्या श्रीमंत आणि ताकदवान भारतीयांच्या हातात जाणं — हेच का स्वातंत्र्य? यामुळे सामान्य माणसाच्या आयुष्यात काही फरक पडणार आहे का? कामगार आणि शेतकऱ्यांची परिस्थिती बदलणार का? त्यांना त्यांचा हक्क मिळणार का?"

स्वातंत्र्य हा फक्त पहिला टप्पा आहे. आपला खरा उद्देश असा देश निर्माण करणं आहे जिथे **प्रत्येक वर्गातील लोकांना समानतेने जगण्याचा अधिकार मिळेल.**

**जिथे धर्माच्या नावावर समाजात फूट पडणार नाही. असा देश जिथे माणूस माणसावर अन्याय करणार नाही.**

हे कठीण आहे, पण अशक्य नाही. भारतात इतके धर्म, जाती, भाषा आणि संस्कृती आहेत, त्यांना एकत्र ठेवणं सोपं नाही. पण जर आपण आज हे समजून घेतलं नाही आणि यासाठी संघर्ष केला नाही, तर भारत स्वतंत्र होईल, पण तो एक भ्रष्ट, शोषण करणारा आणि सांप्रदायिक समाज बनून राहील.

आपण सगळ्यांनी मिळून एक समाजवादी देश निर्माण करायचा आहे आणि ते आपल्या पक्षाच्या नावातही दिसायला हवं. म्हणून 'हिंदुस्तान रिपब्लिकन असोसिएशन'चं नाव बदलून 'हिंदुस्तान सोशलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन' करायचं आहे.

आझाद यांना कळवा की जो निर्णय होईल तो त्यांना मान्य असेल. जर तुम्ही सगळे माझ्यासोबत असाल, तर आपण आजपासून ब्रिटिश राजवटीविरुद्ध लढाई जाहीर करतो. आपला पहिला हल्ला सायमन कमिशनवर असेल, आणि या आंदोलनात आपण लाला लाजपत राय यांच्यासोबत उभे राहू."